# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

**२०२०**

गुन्हे शाखा, नवी मुंबई

दिनांक १६.०१.२०२०

## सोनसाखळी व मोटार सायकल चोरणा–या सराईत आरोपीस नवीमुंबई, गुन्हे शाखा, कक्ष–२, कडील पोलीसांनी केले जेरबंद

नवीन वर्षाच्या सुरुवातीला नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत महिलांच्या गळयातील सोनसाखळी चोरीचे गुन्हे सतत घडत होते. त्याबाबत माननीय पोलीस उपआयुक्त श्री प्रविणकुमार पाटील,गुन्हे शाखा, नवी मुंबई यांनी गुन्हे शाखेतील सर्व पथकांना आदेशित करुन सदरच्या गुन्हेगाराचा शोध घेवून घडलेले गुन्हे तात्काळ उघडकीस आणण्याचे सक्त आदेश दिले होते. माननीय वरिष्ठांचे आदेशाचे पालन करुन गुन्हे शाखा कक्ष, २ पनवेल येथील पोलीस नाईक २३३४/प्रफुल्ल मोरे यांना मिळालेल्या गुप्त बातमीच्या अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष २, पनवेल येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. के.आर.पोपेरे, सहायक पोलीस निरीक्षक शरद ढोले, संदीप गायकवाड व पथक असे बुधवार दिनांक ०८.०१.२०२० रोजी रात्रौ २०.३० वाजता कर्नाळा उरण बायपास रोड याठिकाणी पोहचताच त्याठिकाणी सराईत व सध्या जामीनावर असलेला इसम नामे मोहम्मद इसरार इस्त्राईल खान, वय ३८ वर्षे, धंदा – नाही, सध्या राहणार – मुंब्रा, कौसा, जि. ठाणे, मुळ राहणार – प्रतापगड, उत्तरप्रदेश हयाला पोलीसांची चाहूल लागल्याने तो पळून जात असताना त्यास पोलीस पथकातील पोलीस नाईक २३३४/प्रफुल्ल मोरे, पोलीस हवालदार १९३०/राजेश बैकर, पोलीस हवालदार ९२९/संजीव पगारे यांनी पाठलाग करुन त्यास पकडून कार्यालयात आणून त्याचेकडे मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक शरद ढोले यांनी सखोल तपास केला असता आरोपीत इसम नामे मोहम्मद इसरार इस्त्राईल खान, वय ३८ वर्षे, याचेकडून ७ तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र, चैनी व एक बजाज पल्सर मोटार सायकल असा एकूण **एकुण २,८३,६००/–रू.** किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील कामोठे, कळंबोली, रबाळे, खारघर पोलीस ठाणे हद्दीतील ६ **गुन्हे व मुंबई शहरातील बांगुरनगर पोलीस ठाणे येथील मोटार सायकल चोरीचा १ असे गुन्हे उघडकीस** आणुन उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

**आरोपी मोहम्मद इसरार इस्त्राईल खान याचेकडुन उघडकीस आलेले गुन्हे खालील प्रमाणे–**

१) कामोठे पो. स्टे. गु. र. नं. १०/२०२०,क.३९२ भादंवि
२) कळंबोली पो. स्टे. गु. र. नं. ०५/२०२०,क.३९२ भादंवि
३) खारघर पो. स्टे. गु. र. नं.३/२०२०,क.३९२ भादंवि
४) कामोठे पो. स्टे. गु. र. नं.४/२०२०,क.३९२ भादंवि
५) रबाळे पो. स्टे. गु. र. नं.५६३/२०१९,क.३९२ भादंवि
६) कळंबोली पो.ठाणे गुरक्र. ०२/२०२० कलम ३९३ भादंवि
७) बांगुरनगर पो.ठाणे, मुंबई गुरक्र. ४५७/२०१९, कलम ३७९ भादंवि.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.के.आर.पोपेरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक शरद आर.ढोले,सहायक पोलीस निरीक्षक संदीप गायकवाड, पो.हवा./९२९ संजीव पगारे,पो.हवा.१९३०/राजेश बैकर, पोहवा/१३४३ मधुकर गडगे, पो.ना./२३३४ प्रफुल मोरे, पोकॉ/३५७७ प्रविण भोपी, पो.ना.२७००/सुनिल कुदळे, पो.शि.२७९२/अभय सागळे, सर्व गुन्हे शाखा, कक्ष २, पनवेल यांनी केलेली आहे.

————————